# * फार्मसी महाविद्यालय सासवड येथे राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान *

भारत सरकारने २ ऑक्टोबर २०१४ रोजी जाहिर केलेल्या स्वच्छ व स्वस्थ भारत या संकल्पनेनुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शेठ गोविंद रघुनाथ साबळे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय सासवड येथे स्वच्छ व स्वस्थ भारत अभियानांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाअंतर्गत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी खळद तसेच सासवड शहरातील परीसरामध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती केली या जनजागृतीमध्ये विद्यार्थ्यांनी स्वच्छता व त्याचे होणारे फायदे याचे महत्व समजावून सांगितले. या अभियानांअतंर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्वच्छ व स्वस्थ भारतासाठी शपथ ग्रहण केली. तसेच या अभियाना अंतर्गत विद्यार्थ्यांनी विचारमंथन कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमाची प्रस्तावना राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.अमोल काळे यांनी केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक भोसले यांनी आपल्या मनोगतामध्ये महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्यांनी इतर शंभर लोकांना स्वच्छतेचे महत्व समजावून सांगावे असे आवाहन केले व "मी स्वच्छ माझा परीसर स्वच्छ, मी स्वच्छ माझे कुंटूब स्वच्छ अशा संकल्पनेतून मी स्वच्छ माझा देश स्वच्छ असा मोलाचा संदेश दिला.

महाविद्यालयातील कु.अभिजीत ताकवले, कु.स्वप्नील आटोळे, कु.मृदुला सोनवणे, कु.प्रणेश मेमाणे, कु.मयुर मोरे व कु.विशाल जाधव या विद्यार्थ्यांनी एक कदम स्वच्छता की और, Quit India: Clean India, My Campus Clean Campus, राष्ट्रपीता महात्मा गांधी व राष्ट्रसंत गाडगेबाबा यांचे स्वच्छतेबद्दलचे योगदान आपल्या मनोगतामध्ये व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालक कु.रजद जमदाडे यांने केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी कल्याण व विकास मंडळ अधिकारी डॉ.वैशाली उंडाळे तसेच प्रा.रूपाली जाधव, प्रा.हनुमंत पाटील, प्रा.दिपाली जगताप उपस्थित होते. या कार्यक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी श्री.संदिप उरसळ, श्री.दिपक गाडेकर, श्री.डी.ई.जगताप आणि श्री.नितीन पवार यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा.अमोल काळे व आभार प्रदर्शन प्रा.विशाखा गायकवाड यांनी केले.